**प्रेस नोट** दिनांक : ११/०६/२०२४

## निजामपुरा पोलीस स्टेशन, भिवंडी चे नेमणुकीतील पोलीस नाईक यांनी लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | ठाणे |
| पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक | निजामपुरा पोलीस स्टेशन, भिवंडी |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री निळकंठ सुभाषराव खडके, पोलीस नाईक/१२९७ नेमणूक निजामपुरा पोलीस स्टेशन, भिवंडी. |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ३०,०००/— रूपये |
| स्विकारलेल्या लाचेची रक्कम | २९,०००/— रूपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांना निजामपुरा पो.स्टे. गु.र.नं. ६१४/२०२४ भादवि कलम ३५३, ३२३, २९४, ५०६, ३४ मध्ये त्यांना अटक न करणे साठी लोकसेवक यांनी ३०,०००/— रूपयाची लाचेची मागणी केली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. १०/०६/२०२४ रोजी पडताळणी केली असता नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडून ३०,०००/— रू लाचेची मागणी करून तडजोडअंती २९,०००/— रूपये स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार ला.प्र.वि., ठाणे युनिटने आज दि. ११/०६/२०२४ रोजी सापळयाचे आयोजन केले असता लोकसेवक श्री. निळकंठ सुभाषराव खडके यांनी तक्रारदार यास शासकीय दुचाकी वाहनावर बसवून आदर्श पार्क चे जवळ तक्रारदार यांचे कडुन लाचेची रक्कम २९,०००/— स्विकारली. तदनंतर थोडयावेळोने लोकसेवक पो.ना. खडके हे निजामपुरा पोलीस स्टेशन येथे आले असता अॅन्टी करप्शनचे स्टाफला निजामपुरा पोस्टे येथे पाहिल्यानंतर पो.ना. खडके यांनी पळुन जात असताना पो.उप अधिक्षक श्री. विशाल जाधव यांनी त्यास पकडण्याचा प्रयत्न केला असता, पोना खडके हे पो.उप अधीक्षक श्री. विशाल जाधव यांना धक्का देवुन दुखापत करून लाचेच्या रक्कमेसह पळुन गेले. आलोसे यांचे विरूध्द गुन्हा नोंद केला असून आलोसे यांचा शोध सुरू आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी :— मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**१) मा. श्री. गजानन राठोड, अपर पोलीस अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**२) मा. श्री. महेश तरडे, अपर पोलीस अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांच्याशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता — ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेतस्थळ —acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई — मेल —spacbthane@mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन —acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :— १०६४
दुरध्वनी क्र. :— ०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसअॅप नं :— ९९३०९९७७००.

( विशाल जाधव )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे